# स्थायी समिती
## दाखल विषय – दि. १५/९/२०२०

**विषय क्रमांक :– ५१२ त्वर्य**

मा.सुनिल कांबळे, आमदार व मा.राजेंद्र शिळीमकर यांचे दि.१५/९/२०२० चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. ४७३ दि. २५/८/२०२० चा फेरविचार करण्यात यावा.

(विविध प्रकारच्या बांधकाम परवानगी अंतर्गत आकारण्यात येणारे विविध प्रिमियम/शुल्क टप्पेनिहाय भरणेची सवलत देणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत

१) पुणे महानगरपालिका अधिनियम मनपा/लोकसेवा/मआ/४५९/२०१५ दि.१५ जुलै २०१५ अन्वये येणारे प्रिमियम शुल्क र.रु. ५० लक्ष पेक्षा जास्त असल्यास अशा सर्व प्रस्तावांना प्रिमियम (Fire Premium) सह ४०%, ३०% व ३०% असा भरणा १ ल्या, १२ व्या व २४ व्या महिन्यांत भरणेची सवलत देणेस
२) विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावली २०१७ मधील कलम १७.१, १७.३, १७.४, २४.१ व २४.१० अन्वये महानगरपालिकेकडे देय निवासी, व्यापारी, औद्योगिक व आय.टी.क्षेत्राच्या प्रिमियम एफ.एस.आय. (F.S.I.) पोटी जमा होणाऱ्या मनपाच्या हिस्स्याचे देय प्रिमियम शुल्क टप्पेनिहाय ८.५०% व्याजासह भरणेस विकसकांना वरीलप्रमाणे सवलत देणेस
३) विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावली २०१७ मधील कलम १.४ नुसार डी.सी.पी.आर. २०१७ व डीसीआर वापरण्याच्या विकल्पास २०१७ मधील कलम १७.७, १८.२६ व विकास नियंत्रण नियमावली मधील कलम १५.४.२ अन्वये बाल्कनी, जीना, पॅसेज, डबल हाईट टेरेस इत्यादी मधील देय प्रिमियम शुल्क टप्पेनिहाय ८.५०% व्याजासह भरणेस विकसकांना वरीलप्रमाणे सवलत देणेस
४) दुसरा तीसरा किंवा चौथा हप्ता भरण्यास विलंब झाल्यास १८% प्रतिवर्ष इतक्या दंडाची आकारणी करण्यास
५) शेवटचा हप्ता भरेपर्यंत एकुण बांधीव क्षेत्राच्या १०% अथवा सर्वात वरील एका मजल्याचा (यापैकी जास्तीत जास्त) पूर्णत्वाचा दाखला राखून ठेवण्यास
६) याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देणेस
७) वरील प्रस्ताव मे.शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेस
८) विकसकांनी पूर्ण रक्कम एक रकमी भरणार असेल तर त्यांना १०% सवलत देणेस,
९) पुणे महापालिकेच्या हिस्स्यामधील बांधकाम शुल्क/प्रिमियम टप्पेनिहाय सवलत देण्यास मा.मुख्य सभेची मान्यता मिळेल या भरवशावर मनपा प्रशासनाने कार्यवाही करण्यास

**विषय क्रमांक :– ५१३ त्वर्य**

शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेची आर्थिक तरतूद संपुष्टात येत असल्याने रक्कम रुपये ५,००,००,०००/– (अक्षरी र.रू.पाच कोटी फक्त) खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा. आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२८७ दि.१५/९/२०२० चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०–२०२१ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, CE17A242/ SJ6-93, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय | ५ कोटी | ---- |
| नविन सुचवलेले काम<br>आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, RE17F154, ७ क रुग्णालये , प्रसुतीगृह औषधालये, क.सेवकांसाठी आरोग्य सहाय्य योजना पुणे शहरातील झोपडट्टीमध्ये राहणारे पिवळे रेशनकार्डधारक/वार्षीक उत्पन्न र. रु. एक लाखापर्यंतच्या नागरिकांसाठी पुणे मनपातर्फे आरोग्य सहाय्य योजना | ---- | ५ कोटी |

विषय क्रमांक :– ५१४ त्वर्य

भाकरे सुपर स्पेशालीटी हॉस्पिटल ॲन्ड रिसर्स इनस्टीटयुट यांना बालेवाडी स.नं.२०,२१ व बाणेर स.नं.१०९ येथे उभारण्यात आलेल्या कोव्हिड केअर हॉस्पिटल (डी.सी.एच)ची वर्कऑर्डर रद्द करणेस व डॉ.भिसे मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटल यांना बालेवाडी स.नं.२०,२१ व बाणेर स.नं.१०९ येथे उभारण्यात आलेल्या डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल (डी.सी.एच) येथील २७० ऑक्सिजनेटेड बेड, २२ आय.सी.यु. व २२ एच.डी.यू (सोबत १० व्हेन्टीलेटर बेड) यांना पीएमआरडीए मार्फत मागविलेल्या निविदेमध्ये एल–१ आलेल्या दराप्रमाणे कोविड–१९ आजाराचा प्रादुर्भाव असेपर्यंत चालविण्यास देणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/२८९ दि.१५/९/२०२०

विषय क्रमांक :– ५१५ त्वर्य

कोविड–१९ च्या अनुषंगाने आपत्कालिन परिस्थितीसाठी पुणे महानगरपालिकेच्या शिवाजीनगर येथील दळवी रुग्णालय कोविड–१९ सेंटर येथे अथवा मनपाने सुचित केलेल्या ठिकाणी लिक्विड ऑक्सिजन टँक पुरविणे, बसविणे, यशस्वी चाचणी देणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.स्पार्क इंडस्ट्रीज यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.५६,५०,०००/– पेक्षा १९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४५,७६,५००/– अधिक जी.एस.टी. १८% र.रुपये ८,२३,७७०/– असे एकूण र.रुपये ५४,००,२७०/– पर्यंत काम करुन घेणेस तसेच दि.१७/८/२०२० रोजी निविदेचे ‘ब’ पाकीट उघडण्यात आले असुन पुर्वलक्षी प्रभावाने दि.१७/८/२०२० पासुन कामाची मुदत ग्राहय धरणेस व त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विदयुत/२८२ दि.१४/९/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ५१६ त्वर्य

कोविड–१९ च्या अनुषंगाने आपत्कालिन परिस्थितीसाठी पुणे महानगरपालिकेच्या वडगाव धायरी येथील लायगुडे रुग्णालय कोविड–१९ सेंटर येथे अथवा मनपाने सुचित केलेल्या ठिकाणी लिक्विड ऑक्सिजन टँक पुरविणे, बसविणे, यशस्वी चाचणी देणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.वायोटेक गॅसेस ॲण्ड इक्विपमेंटस् यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.५६,५०,०००/– पेक्षा १९.२०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४५,६५,२००/– अधिक जी.एस.टी. १८% र.रुपये ८,२१,७३६/– असे एकूण र.रुपये ५३,८६,९३६/– पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विदयुत/२८३ दि.१४/९/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ५१७ त्वर्य

भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत यंत्राच्या सहाय्याने ड्रेनेज लाईन व चेंबरची साफसफाई करणे व गाळ काढणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अंकिता इंजिनिअर्स यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५३,२३,५७२/– पेक्षा ९.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४८,४४,४५०=५२ पर्यंत होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:/२८४ दि.१५/९/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ५१८ त्वर्य

पुणे शहरातील धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत कॉंक्रीट व डांबरी रस्त्याचे मेंटेनन्स व्हॅनद्वारे वार्षिक देखभाल दुरुस्ती विषयक व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शुभंम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८९,१४,९७३/– पेक्षा २४.२५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६७,५३,०९२=०५ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,६९,७९६=७६ पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटीशर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/२८५ दि.१५/९/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ५१९ त्वर्य

औंध क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत विविध ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा करणे (भाग २) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री.स्वामी समर्थ वॉटर सप्लायर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,९९,४०७/– पेक्षा १३.०००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४३,४९,४८४=९० पर्यंत काम करुन घेऊन

त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/२८६ दि.१५/९/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ५२० त्वर्य**

मा.प्रकाश ढोरे व मा.सुनिल कांबळे, आमदार यांचे दि.१५/९/२०२० चे पत्र.

पुणे मनपातील विद्युत विभागाने निविदा क्र. १४४/२०२० अन्वये शनिवारवाडा येथे व्हर्चुअल रियालिटी शो साठी र.रु. ७०.०० लक्ष पर्यंत कामे करण्यासाठी जाहिरात देवून निविदा मागविलेली असुन टाईम स्पाईडर टुरिझम प्रा.लि. यांनी CSR मधुन सदर कामे करण्याची तयारी दर्शविल्याने निविदा क्र. १४४/२०२० रद्द करुन CSR तरतुदीमधुन सदर कामे करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– ५२१ त्वर्य**

मा.प्रशांत जगताप व मा.दत्तात्रय धनकवडे यांचे दि.१०/९/२०२० चे पत्र.

कोरोना रोगाच्या पार्श्वभुमीवर पुणे महानगरपालिका हद्दीतील नागरिकांचे जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी तथा भविष्याकालीन आरोग्याच्या दृष्टीने घातक होवू शकणा-या वायरसचा मुकाबला करणेकामी या वर्षीच्या सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पातील पुणे महानगरपलिकेच्या निधीतुन कर्मचारी वेतन, अत्यावश्यक देखभालीची कामे व गेली काही वर्ष अपुर्ण अवस्थेत असणा-या प्रकल्पांची चालू असणारी कामे वगळता इतर सर्व निधी कुठल्याही नविन विकासकामांवर खर्ची न घालता खालील सुचवित असलेल्या उपाययोजना व प्रकल्पांसाठी बी.पी.एम.सी ॲक्ट ६३(६) नुसार राखीव ठेवण्यात यावा.

१) पुणे महानगरपालिकेच्या ६ झोनमध्ये मोठ्या क्षमतेचे सुसज्ज असे कोरोना वायरस तथा इतर भविष्यकालीन जागतिक महामारींचे निवारण करणेकामी पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या मिळकतींवर ६ सुसज्ज रुग्णालय सुरु करणेकामी निधी राखीव ठेवण्यात यावा.

२) पुणे महानगरपालिकेच्या मालकीची प्रयोगशाळा सुरु करणेकामी निधी राखीव ठेवण्यात यावा.

३) जागतिक पातळीवरचा कायम स्वरुपी वायरस अटॅकचा धोका लक्षात घेता शहरामध्ये कायमस्वरुपी औषध फवारणी यंत्रणा उभी करणे कामी निधी राखीव ठेवण्यात यावा.

४) शहरातील ४५ लाख लोकसंख्येचे फक्त सर्व्हेक्षण करणे इथपर्यंत मर्यादित न राहता प्रत्येक वस्ती, विविध सोसायट्यांमध्ये पुणे महानगरपालिकेच्या वतीने संशयीत तथा कोरोनाबाधीत रुग्णांच्या संपर्कात आलेल्या नागरिकांची आवश्यकतेनुसार तपासणी करणेकरीता पुढील ६ महिने पुरेल एवढा टेस्ट किट साठा करणे कामी निधी राखीव ठेवण्यात यावा.

५) पुणे शहर कोरोना मुक्त करणे कामी लस उपलब्ध झाल्यानंतर केंद्र सरकारने पुणे करांकरीता मोफत लस उपलब्ध करुन न दिल्यास पुणे महानगरपालिकेने स्वत:च्या अर्थसंकल्पीय निधीतुन लस खरेदी करणेकामी निधी राखीव ठेवण्यात यावा.

६) तसेच विविध अत्यावश्यक पायभुत आरोग्य सुविधा उभ्या करण्याकरीता निधी राखीव ठेवण्यात यावा

**विषय क्रमांक :– ५२२ त्वर्य**

मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेत्या व मा.महेंद्र पठारे यांचे दि.१५/९/२०२० चे पत्र.

पुणे शहरात कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव वाढल्याने गेल्या ६ महिन्यांपासून पीएमपीएल बस सेवा पूर्णपणे बंद आहेत. या पीएमपीएलम बंद असल्याने रोजंदारीवर सेवकांना काम नसल्याने अतोनात हाल झालेले आहेत.त्यामुळे बस बंद असल्याने रोजंदारीवर सेवकांना आर्थिक साधन नसल्याने त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आलेली होती.

तरी सर्व रोजंदारी सेवकांना उभारी देण्याकरीता रुपये रक्कम १५ हजार उचल देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– ५२३ त्वर्य**

मा.अविनाश बागवे व मा.बाळा ओसवाल यांचे दि.१५/९/२०२० चे पत्र.

Design, Build, Finance, Operate, Maintain & Transfer the project of Implementation of high impact street light by installing Energy Efficiency dimmable LED street lights along with Feeder basic SCADA system (बी–२ पध्दतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेडंर्सपैकी ठेकेदार टाटा प्रोजेक्टस् लि. यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे असल्याने त्यांचेकडून ५१ टक्के Energy Efficiency प्राप्त करण्यास व त्यानून १.५ टक्का शेअर पुणे मनपास देण्यास व ९८.५ टक्के शेअर ठेकेदारास (विकसक)

यानुसार त्यांचेकडून निविदा अटी शर्तीनुसार १२ वर्षे कालावधीसाठी काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मा.स्थायी समिती ठराव क्र. १२०४ दि. ६/९/२०१६ ने मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार पुणे म.न.पा.चे भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय येथील विद्युत कोठी मधील पुणे म.न.पा. सेवकांची इतरत्र विभागात बदली करून सदर क्षेत्रिय कार्यालयातील संपूर्ण दैनंदिन विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीची कामे मे.टाटा प्रोजेक्ट या खासगी कंपनीमार्फत करून घेणेबाबत चे नियोजन विद्युत विभागामार्फत करण्यात आलेले आहे. सदर कंपनी मार्फत पुणे शहरात बसविण्यात आलेल्या स्मार्ट LED दिव्यांचे निविदा प्रकरणामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व गैरव्यवहार झालेला असून सदर योजना पूर्णपणे फसलेली असून सदर प्रकरण न्यायालयीन प्रविष्ट आहे. असे असताना याच कंपनीकडे संपूर्ण क्षेत्रिय कार्यालयाची विद्युत दुरुस्तीची कामे देणे संयुक्तीक नाही.

तसेच याच धर्तीवर घोले रोड क्षेत्रिय कार्यालय व ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय येथे खाजगीकरण करणेच प्रशासनाचा उद्देश आहे.

या कंपनीबरोबर महानगरपालिकेतर्फे करण्यात आलेल्या करारानुसार पुणे महानगरपालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे.

त्यामुळे मा.स्थायी समिती ठराव क्र. १२०४ दि. ६/९/२०१६ चा फेरविचार करुन या कंपनीबरोबर करण्यात आलेल्या करारातील अटी व शर्ती यांचा फेरविचार करुन त्या बदलण्यात याव्यात.

तसेच मा.मुख्य सभा,पुणे महानगरपालिका यांची पूर्व परवानगी शिवाय सदर बाबत कोणतीही कार्यवाही करणेत येऊ नये.

**शिवाजी दौंडकर**
**प्रभारी नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**